महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

---

जा.क्र तंशिविकापु/विवि/थेट द्वितीय वर्ष प्रवेश/२०२०/ 4342

दिनांक :- 14 DEC 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त,
सर्व पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था,

विषय :- थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या उपलब्ध जागा कळविण्याबाबत...

संदर्भ :- १. .मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २ अ /DSE Vacancy/२०२०/३५८ दिनांक ११/१२/२०२०

२. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक १२२०/प्र.क्र.२०/व्हिडिओ कॉन्फरन्स/२०२०/१२२४ दिनांक ११/१२/२०२०

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्रांची छायाप्रत सोबत जोडलेली आहे. त्यास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्राद्वारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांच्या परिगणने करिता तसेच जागांची नोंदणी करण्यासाठी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांकरीता अनुक्रमे https://dse20.mahacet.org.in/de20/ व https://dsp20.mahacet.org.in/de20/अशा लिंक उपलब्ध करुन दिलेल्या असल्याचे या कार्यालयास कळविले आहे . त्या अनुषंगाने **सर्व संस्थांनी थेट द्वितीय वर्षा करीता रिक्त जागांची अदयावत व बिनचूक माहीती उपरोक्त लिंकद्वारे संस्थेच्या लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने दिनांक १७/१२/२०२० रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यत सादर करावी .** १७/१२/२०२०

सदर माहिती अदयावत करताना खालील सूचना लक्षात घ्याव्यात.

१. पोर्टलवर EWS कोट्यातील रिक्त असलेल्या जागांची माहीती देणे आवश्यक आहे.
२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश रद्द केला असल्यास विद्यार्थ्यास देण्यात आलेल्या असल्यास स्कूल लिव्हींग सर्टिफिकेट संस्थेच्या पत्रासह इमेल द्वारे सादर करावेत. (ropune@dtemaharashtra.gov.in )
३. सोबत दिलेल्या नमुन्यात संस्थेच्या प्राचार्यानी स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र इमेल द्वारे सादर करावे. (ropune@dtemaharashtra.gov.in )

४. या कार्यालयाने व तंत्रशिक्षण संचालनालयाने मंजूर केलेल्या विद्यार्थ्यांच्या संस्था बदलामुळे रिक्त झालेल्या जागाची माहितीतील बदल या कार्यालयाकडून अथवा तंत्रशिक्षण संचालनालया कडुन करण्यात येईल. सदर बदलानंतरची माहिती तपासून त्या बाबत संस्था प्रमुखांनी खात्री करावी. याबाबत काही त्रुटी आढळल्यास तात्काळ या कार्यालयाशी (श्री.शिंदे, प्रोग्रॅमर यांचेशी) संपर्क साधून तसे निदर्शनास आणुन दयावे.

५. प्रवेश नियामक प्राधिकरण / राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या संकेतस्थळावर थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची रिक्त जागांची माहिती जाहीर करण्यात आल्यानंतर ती तपासुन त्याबाबत काही त्रुटी आढळल्यास तात्काळ या कार्यालयाशी (श्री.शिंदे, प्रोग्रॅमर यांचेशी) संपर्क साधून तसे निदर्शनास आणुन दयावे.

**सर्व अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थाप्रमुखानी दिलेली माहीती योग्य व अचूक असल्याचे सोबतच्या नमुन्यातील प्रमाणपत्र संस्थेच्या लेटर हेडवर सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत रिक्त जागांची माहिती या कार्यालयाच्या लॉगीनमध्ये प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडुन रिक्त जागा मंजुर करण्यात येणार नाहीत. याबाबत सर्व संस्था प्रमुखांनी गाभीर्यानी नोंद घ्यावी.**

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

**सोबत :- संदर्भिय पत्र व प्रमाणपत्राचा नमुना**

# प्रमाणपत्र

संस्थेचे नाव :-
संस्था कोड :-

प्रमाणित करण्यात येते की शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांची विभागीय कार्यालयास संस्थेच्या लॉगीन मधुन सादर केलेली परिगणना बिनचूक करण्यात आलेली आहे याबाबत मी स्वतः व्यक्तिशः खात्री केलेली आहे. संस्थेने शाखाबदल मंजूर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची पात्रता तपासून व रिक्त जागेबाबतची खात्री करुन विद्यार्थ्यांना शाखाबदल मंजूर करण्यात आलेला आहे. संस्थेच्या लॉगीनमधून सादर केलेल्या रिक्त जागांच्या माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यात येणार असल्याबाबत व सदर रिक्त जागांच्या परिगणनेमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यास संस्था प्रमुख संपुर्णपणे जबाबदार असल्या बाबतची मला जाणीव आहे

प्राचार्य,

स्वाक्षरी व संस्थेचे सिल

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:

क्रमांक: २अ/एडीएम/DSE Vacancy/ २०२०/ ३५८ दिनांक : 11 DEC 2020

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांच्या परिगणनेकरिता तसेच EWS कोटयातील रिक्त राहिलेल्या जागांची नोंदणी करण्याबाबत...

संदर्भ : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक १२२०/ प्र.क्र.२०/ व्हिडिओ कॉन्फरन्स/२०२०/१२१४, दिनांक ११.१२.२०२०

वरील विषयाबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी संदर्भाधीन पत्राद्वारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांच्या परिगणनेकरिता तसेच EWS कोटयातील रिक्त राहिलेल्या जागांची नोंदणी करण्यासाठी https://dse२०.mahacet.org.in/de२०/ अशी लिंक उपलब्ध करुन दिलेली असल्याचे कळविले आहे.

सदर लिंकवर रिक्त जागांची परिगणना करुन ती माहिती भरण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात यावे. तसेच सदरहू माहिती दिनांक १८.१२.२०२० पर्यंत परिगणित करुन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांना अवगत करण्याचेही कळविले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

[illegible]

क्र. तंशिप - १२२०/प्र.क्र 20/सीडीओ कॉन्फरन्स/२०२०/1215 दिनांक - 11 DEC 2020

प्रति,

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय,

०३, महापालिका मार्ग,

मुंबई ४०० ००१

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत....

संदर्भ : आपले पत्र क्र. ०२/एनजीसी/नि.सं.व./मान्यता/२०२०/९२८, दिनांक ०२/१२/२०२०

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता द्वितीय वर्ष शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी शाखेच्या विद्यार्थ्यांचे संस्था बदल केल्याची नोंद थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठीच्या पोर्टलवर करण्यासाठी संचालनायाच्या तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांना युझर आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती करण्यात आलेली होती.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांच्या परीगणनेकरीता त्याचप्रमाणे EWS कोटयातील रिक्त राहिलेल्या जागांची नोंदणी करण्यासाठी पुढील प्रमाणे लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**https://dse20.mahacet.org.in/dse20/**

आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालिल विभागीय कार्यालये व संस्थांना याबाबत आपल्या स्तरावर अचूक माहिती भरण्यासाठी त्वरीत अवगत करण्यात यावे व संबंधित माहिती एकत्रित संकलित करुन या कार्यालयास दिनांक १८/१२/२०२० पर्यंत निश्चितपणे उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणेकरुन सदर माहितीचा उपयोग थेट द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मदत होईल.

(श्री. चिंतामणी जोशी) भा.प्र.से.

आयुक्त,

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,

महाराष्ट्र राज्य, मुंबई